# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः10.09.2024** **वारःमंगळवार**

---

1. अणुऊर्जा आणि पेट्रोलियमसह विविध क्षेत्रातील सहकार्यासाठी भारत आणि युएई दरम्यान पाच करार,
2. कर्करोगांवरील औषधांवर आता पाच टक्के आणि निवडक स्नॅक्सवर 12 टक्के जीएसटी,
3. नाशिक इथं आदिवासी बांधवांसाठी 'आदिवासी विद्यापीठ' सुरू करणार-राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांची ग्वाही,
4. बांग्लादेश विरुद्धच्या कसोटी मालिकेसाठी भारतीय संघाची घोषणा आणि
5. विदर्भात अतिवृष्टीचा इशारा.

**पंतप्रधान-आबुधाबी युवराज**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल नवी दिल्ली इथं, भारताच्या दौऱ्यावर असलेले अबुधाबीचे युवराज शेख -खालिद -बिन-मोहम्मद-बिन-झायेद-अल-नाह्यान यांची भेट घेऊन चर्चा केली. उभय नेत्यांनी भारत आणि संयुक्त अरब अमिरात अर्थात UAE दरम्यान, उदयोन्मुख क्षेत्रांमध्ये व्यापक धोरणात्मक भागीदारी भक्कम करण्याच्या संधींवर चर्चा केली. या चर्चेदरम्यान, अणुऊर्जा आणि पेट्रोलियम प्रकल्प तसंच ऊर्जा प्रकल्पांशी संबंधित पाच करारांवर स्वाक्षरी करण्यात आली. युवराज नाह्यान यांनी काल राजघाटावर जाऊन राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या स्मृतिस्थळाचं दर्शन घेतलं. आज ते मुंबईत एका व्यापारी परिषदेत सहभागी होणार आहेत. या परिषदेत दोन्ही देशांचे उद्योजक आणि व्यावसायिक सहभागी होणार आहेत. भारत आणि संयुक्त अरब अमिरात यांच्यात ऐतिहासिक मैत्रीपूर्ण संबंध असून, गेल्या काही वर्षांत व्यापार, गुंतवणूक, ऊर्जा, तंत्रज्ञान, शिक्षण आणि संस्कृती अशा अनेक क्षेत्रांमध्ये दोन्ही देशांमधील धोरणात्मक भागीदारी आणखी दृढ झाली आहे. चीन आणि अमेरिकेनंतर, संयुक्त अरब अमिरात हा भारताचा तिसरा सर्वात मोठा व्यापारी भागीदार आहे.

**जी एसटी**

जीएसटी परिषदेनं कर्करोगाच्या औषधांवरील वस्तू आणि सेवा कर 12 टक्क्यांवरून 5 टक्क्यांपर्यंत कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. नवी दिल्ली इथं काल झालेल्या चोपनाव्या जीएसटी परिषदेच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला, असं अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी बैठकीनंतर प्रसारमाध्यमांना सांगितलं. निवडक स्नॅक्स म्हणजे किरकोळ खाण्याच्या पदार्थांवरील जीएसटी 18 टक्क्यांवरून 12 टक्के करण्यात आला आहे. केंद्र आणि राज्य सरकारांनी स्थापन केलेल्या विद्यापीठांना संशोधनासाठी दिलेला निधी आणि ज्यांना प्राप्तीकर सवलत मिळाली आहे, त्यांना जीएसटीमधून सवलत देण्यात आली आहे. जीवन आणि आरोग्य विम्यावरील कराचा दर कमी करण्याचा विचार करण्यासाठी मंत्रीगट स्थापन करण्यात येईल, असंही सीतारामन यांनी सांगितलं.

**वीज-कंत्राटी**

महानिर्मिती, महापारेषण, महावितरणमधील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मूळ वेतनात 19 टक्के वाढ करण्यात आली असून यावर्षी मार्चपासून ही वाढ लागू करण्यात आल्याची घोषणा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल या कंत्राटी कामगारांच्या विविध संघटनांसोबत मुंबईत घेतलेल्या बैठकीनंतर केली. महानिर्मिती कंपनीतील कामगारांनी ई.एस.आय.सी.ची वेतन मर्यादा ओलांडली असल्यानं आता ऊर्जा विभागाच्या सर्व कंपन्यातील कंत्राटी कामगारांना पाच लाखांपर्यंत मेडिक्लेम सुविधा लागू करण्यात येत असल्याचंही त्यांनी यावेळी जाहीर केलं.

**<u>नाशिक-आदिवासी विद्यापीठ</u>**

नाशिक इथं आदिवासी बांधवांसाठी 'आदिवासी विद्यापीठ' सुरू करण्यात येईल, त्यामध्ये 80 टक्के आदिवासी, तर 20 टक्के अन्य विद्यार्थ्यांचा समावेश राहील, असं प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी काल नाशिक इथं केलं. ते काल नाशिक इथं बातमीदारांशी बोलत होते. या विद्यापीठात अभियांत्रिकी, माहिती तंत्रज्ञान आदी विषयांच्या सर्वोत्तम सुविधा असतील. नाशिक औद्योगिकदृष्ट्या विकसित होत असल्यानं या विद्यापीठातील विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी निर्माण होतील, असंही ते म्हणाले.

**<u>अमित शहा-गणपती दर्शन</u>**

राज्याच्या दौऱ्यावर असलेले केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी काल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ‘वर्षा’ या शासकीय निवासस्थानी तसंच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सागर या शासकीय निवासस्थानी जाऊन गणरायाचं दर्शन घेतलं. तसंच, 'लालबागचा राजा' गणेशोत्सव मंडळाला भेट देऊनही श्री गजननाचं दर्शन घेतलं.

**<u>एसटी-प्रवासी</u>**

यावर्षी गणपती उत्सवासाठी गेल्या पाच दिवसांत, मुंबई, ठाणे आणि पालघर क्षेत्रातून सुमारे अडीच लाखांहून जास्त चाकरमाने एसटीने आप-आपल्या गावी म्हणजे कोकणात रवाना झाले आहेत. 3 सप्टेंबर ते 8 सप्टेंबर या काळात झालेला एस.टी. कर्मचाऱ्यांचा संप, वाहतूक कोंडी आणि त्यामुळे होणारा विलंब अशा अडचणींवर मात करत एसटी प्रशासनानं सुयोग्य नियोजनाच्या आधारे गेल्या अनेक वर्षातील सर्व विक्रम मोडून काढत यंदा सुमारे पाच हजार गाड्यांच्या माध्यमातून या प्रवाशांची सुरक्षित वाहतूक केली.

**<u>जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिन</u>**

आज जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिन आहे. जागतिक स्तरावर दरवर्षी आत्महत्येमुळे 7 लाखांपेक्षा जास्त मृत्यू होतात. 2024-2026 या तीन वर्षासाठी, 'संभाषण सुरू करा' या आवाहनासह 'आत्महत्या विषयाचं कथानक बदलणे' ही संकल्पना आहे. याबाबत, पुण्यात आत्महत्या प्रतिबंधासाठी काम करणाऱ्या कनेक्टींग ट्रस्ट या संस्थेच्या शिल्पा तांबे यांनी आकाशवाणीशी बोलताना सांगितलं....

**<u>अकोला-माझी शाळा</u>**

मुख्यमंत्री माझी शाळा उपक्रमात बुलढाणा जिल्ह्याने पहिला क्रमांक पटकावला असून अकोला जिल्हा दुसऱ्या क्रमांकावर आहे. या उपक्रमात अकोला जिल्ह्यातील 94 टक्के शाळांनी सहभाग नोंदवला. केंद्र पातळीवरील मूल्यांकनातही अकोला जिल्ह्यानं अव्वल स्थान पटकावलं आहे.

**<u>यवतमाळ-ई-रिक्षा वितरण</u>**

प्रधानमंत्री खाणकाम योजनेंतर्गत यवतमाळ जिल्ह्यात नेर तालुक्यातील लोक संचलित साधन केंद्राच्या वतीनं 36 महिला बचतगटांना, 'तेजस्विनी कृषि माल वाहतूक ई-रिक्षाचं' वाटप जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांच्या हस्ते काल करण्यात आलं. ई-रिक्षाद्वारे महिलांच्या विविध उद्योग व्यवसायाला चालना मिळेल आणि महिलांना आर्थिक बळकटीकरणला मदत होईल, असं राठोड यावेळी म्हणाले.

**<u>सिंधुदुर्ग-आयुष्यमान कार्ड</u>**

आयुष्मान भारत योजनेअंतर्गत सिंधुदुर्ग जिल्ह्यानं राज्यात अव्वल स्थान कायम राखलं आहे. गेल्या ऑगस्ट महिन्याच्या अखेरपर्यंत जिल्ह्यातल्या 4 लाख 12 हजार 33 लोकांनी आयुष्यमान भारत योजनेचं कार्ड काढलं आहे. कार्ड काढण्यामध्ये जिल्हा राज्यात अव्वल असला तरी उपचार घेण्यामध्ये मात्र उदासीन असल्यामुळे मागं राहिला आहे.

**नांदेड-नुकसानी आढावा**

नांदेड जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानाचा मदत आणि पुनर्वसन मंत्री अनिल पाटील यांनी काल आढावा घेतला. जिल्हाधिकारी अभिजीत यांनी त्यांना नुकसानीची माहिती दिली. अनिल पाटील, नांदेड तालुक्यातील कासारखेडा, आलेगाव आणि निळा या गावांना भेटी देऊन पाहणी करणार आहेत.

**हिंगोली-गणपती**

हिंगोली जिल्ह्यात एकंदर 1464 ठिकाणी गणेश मूर्तींची स्थापना करण्यात आली आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत जिल्ह्यातील 710 पैकी 305 गावांनी 'एक गाव एक गणपती' ही संकल्पना राबवली आहे. अनेक गणेश मंडळांनी सामाजिक देखावे सादर करण्यासोबतच गरजूंना मदत करण्याची तयारी केली आहे. पालघर जिल्ह्यातल्या डहाणू मधल्या उर्से या गावी 1973 सालापासून 'एक गाव, एक गणपती' स्थापन करण्यात येत आहे. लोकमान्य टिळकांनी ज्या विचारातून सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात केली होती तीच विचारधारा पुढे नेत ही संकल्पना राबवली जात आहे.

**जायकवाडी धरण**

मराठवाड्यासाठी महत्वाचं असलेल्या पैठण इथलं जायकवाडी धरण पूर्ण क्षमतेनं भरल्यामुळं धरणाचे सहा दरवाजे अर्ध्या फुटाने उघडून गोदावरी नदीपात्रात विसर्ग करण्यात येत आहे. धरणात येणाऱ्या पाण्यानुसार विसर्ग कमी अथवा जास्त करण्यात येईल, असं जलसंपदा विभागानं कळवलं आहे.

**क्रिकेट-संघ निवड**

बांगलादेशविरुद्ध आगामी दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी भारताने आपला संघ जाहीर केला आहे. KL राहुल आणि ऋषभ पंत यांनी संघात पुनरागमन केलं असून डावखुरा वेगवान गोलंदाज यश दयाल याची कसोटीं सामन्यांसाठी प्रथमच वर्णी लागली आहे. संघाच्या कर्णधारपदी रोहित शर्माची निवड करण्यात आली आहे. या मालिकेतील पहिला सामना 19 सप्टेंबरपासून चेन्नई इथं खेळला जाणार आहे.

**पाऊस-रत्नागिरी, गडचिरोली**

गडचिरोली जिल्ह्याच्या दक्षिण भागात मुसळधार पाऊस पडल्यानं पर्लकोटा नदीला पूर आला असून, पुराचं पाणी भामरागड गावात शिरलं आहे. खबरदारीचा उपाय म्हणून काही नागरिकांना निवारागृहात हलविण्यात आलं आहे. पुरामुळं भामरागड-आलापल्ली, आष्टी-मुलचेरा आणि आलापल्ली-सिरोंचा हे तीन प्रमुख मार्गावरील वाहतूक बंद आहे.

रत्नागिरी जिल्ह्याच्या सर्व तालुक्यांमध्ये यंदा पावसानं सरासरी ओलांडली आहे. कालपर्यंतच्या आकडेवारीनुसार, सर्वाधिक म्हणजेच सरासरीच्या 135 टक्के पाऊस रत्नागिरी तालुक्यात पडला असून, मंडणगड तालुक्यात सर्वांत कमी म्हणजे 104 टक्के पावसाची नोंद झाली आहे. संपूर्ण जिल्ह्याच्या पर्जन्यमानाचा विचार करता सरासरीच्या 115 टक्के पावसाची नोंद आतापर्यंत झाली आहे.

**हवामान**

विदर्भात अतिशय मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. कोकण, मध्य महाराष्ट्राचा घाट प्रदेश आणि मराठवाड्यात जोराचे वारे आणि वीजांसह मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.